# विश्वस्त संस्था, अशासकीय संस्था यांचेसह उपक्रम राबविणेबाबत मार्गदर्शक नियमावली

**विश्वस्त संस्था, अशासकीय संस्था यांचे राष्ट्रीय सेवा योजना समवेत उपक्रम राबविणेकरीता –**

1. **संस्था नोंदणीकृत अथवा शासनमान्य असणे आवश्यक –**
इच्छूक विश्वस्त संस्था, अशासकीय संस्था ही मा. धर्मदाय आयुक्त कार्यालय यांचेकडे विहीत नोंदणी झालेली नोंदणीकृत संस्था अथवा शासनमान्य संस्था असावी.

2. **संस्थेची संक्षिप्त माहिती :–**
सादर केलेल्या प्रस्तावामध्ये संबंधित संस्थेद्वारे आपली संक्षिप्त माहिती देणेत यावी. जसे की संस्थेचे स्थापना वर्ष, आतापर्यंत केलेल्या कार्याविषयी व समाजास झालेल्या लाभाविषयीची माहिती, वार्षिक लेखापरीक्षण अहवालाबाबत संक्षिप्त माहिती, शासनमान्यता असल्यास शासन उपक्रमातील विशेष योगदानाविषयी माहिती तसेच संस्थेने स्वत: एखादा प्रारूप प्रकल्प (Role Model) निर्माण केले असल्यास सदर प्रकल्पाविषयी व समाजास झालेल्या / होणा–या लाभाविषयी विस्तृत माहिती अन्य अनुषंगिक माहिती नमूद करणेत यावी.

3. **प्रस्तावित उपक्रम व जबाबदा–या तपशिल :–**
सादर केलेल्या प्रस्तावामध्ये संबंधित संस्थेने राष्ट्रीय सेवा योजना समवेत कोणकोणते उपक्रम राबविणार आहेत याबाबत व त्याविषयी प्रस्तावित करण्यात येणा–या जबाबदा–यांविषयी स्पष्टता करावी.

4. **उपक्रमाचा समाजास होणारा प्रस्तावित लाभ / फायदा :–**
सादर केलेल्या प्रस्तावामध्ये संबंधित संस्थेने राष्ट्रीय सेवा योजना समवेत राबविण्यात येणा–या उपक्रमाचा समाजास होणारा प्रस्तावित लाभ / फायदा याबाबत स्पष्टता करावी.

5. **आर्थिक उत्तरदायित्व :–**
प्रोत्साहनपर देणेत येणा–या प्रमाणपत्रे, बक्षिसे, पुरस्कार याबाबतचा खर्च विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व संबंधित संस्था यांचे संयुक्त विद्यमाने करणेत यावा. राष्ट्रीय सेवा योजना शिबीरांव्यतिरीक्त व विद्यापीठ अनुदानाव्यतिरीक्त घेणेत येणा–या सर्व नियोजन, कार्यक्रम, उपक्रमंचा खर्च संबधित संस्थेद्वारे करणेत यावा. **तसेच सादर केलेल्या प्रस्तावामध्ये संबंधित संस्था कोण–कोणत्या आर्थिक खर्चाचा किंवा प्रस्तावित खर्चाचा भार उचलणार आहे याबाबत स्पष्टता नमूद करणेत यावी.**

6. **संयुक्तिक जबाबदारी :–**
संबंधित संस्थेने प्रस्तावित केलेल्या विविध उपक्रम आयोजन, कार्यवाही, अंमलबजावणी, परिक्षण, आढावा व अनुषंगिक बाबींविषयी राष्ट्रीय सेवा योजना आणि संबंधित संस्था यांची संयुक्तिक जबाबदारी असेल. ( सदर बाब संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावामध्ये नमूद करणे आवश्यक आहे) याबाबतच्या सामंजस्य करारावर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना संचालक स्वाक्षरी करतील व संबंधित संस्थेच्या वतीने संस्था अध्यक्ष स्वाक्षरी करतील व राष्ट्रीय सेवा योजना व संबंधित संस्थेच्या प्रस्तावित उपक्रमाविषयी जबाबदा–या निश्चीत करतील.

**7. संभाव्य विवाद व्यवस्थापन अंतिम अधिकार :–**

विश्वस्त संस्था, अशासकीय संस्था यांचे राष्ट्रीय सेवा योजना समवेत उपक्रम राबविताना यथास्थिती एखाद्या बाबीविषयी विवादास्पद घटना घडली, वाद, तंटा निर्माण झाला, राष्ट्रीय सेवा योजना कक्षास आधारभूत तक्रार प्राप्त होवून सदर तक्रारीची खात्री झालेस संबंधित विश्वस्त संस्था, अशासकीय संस्था यांचेसमवेत केलेल्या सामंजस्य करार स्थगित करणे, रद्द करणे याबाबतचे सर्वस्वी अंतिम अधिकार विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व विद्यापीठ प्रशासनास असेल.

**8. सामंजस्य करार कालावधी :–**

विश्वस्त संस्था, अशासकीय संस्था यांचे राष्ट्रीय सेवा योजना समवेत केलेल्या सामंजस्य कराराचा कालावधी पाच वर्षे इतका राहिल. पाच वर्षे मुदतीनंतर संबंधित संस्थेसमवेत केलेला सामंजस्य करार आपोआप संपुष्टात येईल. सदर सामंजस्य कराराचे नुतनीकरण करावयाचे असल्यास सबंधित संस्थेद्वारे विद्यापीठ प्राधिकरणास फेरप्रस्ताव सादर करणेत यावा.

**9. प्राधान्य उपक्रम :–**

विश्वस्त संस्था, अशासकीय संस्था यांचे राष्ट्रीय सेवा योजना समवेत उपक्रम राबविताना खालीलप्रमाणे नमूद उपक्रमांना प्राधान्य देण्याचे सर्वानुमते ठरले.

❖ **युवा विकास उपक्रम :–**

I. व्यक्तिमत्व विकास

II. श्रमदान

III. विविध स्पर्धांचे आयोजन

IV. सांस्कृतिक कार्यक्रम, युवक मेळावे

V. दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक / साहित्य सहाय्य उपक्रम

VI. आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण

VII. आरोग्य शिबीर, सुसंवाद, योग प्रशिक्षण

VIII. युवा विकासाशी निगडीत प्रशिक्षण, कार्यशाळा, कार्यक्रम, उपक्रम

IX. कौशल्ये विकास

X. विद्यार्थीकेंद्रीत कार्यक्रम, उपक्रम

❖ **सामाजिक उपक्रम :–**

I. स्वच्छता मोहिम

II. वृक्षारोपण

III. डिजीटल साक्षरता

IV. जलसंधारण, जलव्यवस्थापन

V. परीसर सुशोभिकरण

VI. दुष्काळ निवारण उपक्रम, पुरग्रस्तांना सहाय्य उपक्रम

VII. जेष्ठ नागरीक उपक्रम

VIII. महिला मेळावा

IX. शेतकरी मेळावा, शेतकरी सक्षमीकरण कार्यक्रम, उपक्रम, सेंद्रीय शेती, शेतीपूरक उपक्रम, शेतकरी समुपदेशन, लॅब टू लॅन्ड उपक्रम

X. ऐतिहासिक वास्तु संवर्धन उपक्रम

XI. समाजाभिमूख / समाज हितकारक कार्यक्रम, उपक्रम

**10. छाननी केल्यानंतर विद्यापीठ मान्यताप्राप्त संस्थांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात यावी व अशा संस्थेबरोबर काम करण्याची मुभा ही ऐच्छिक स्वरूपात राहील.**

विश्‍वस्त संस्था, अशासकीय संस्था यांचेसह उपक्रम राबविणेबाबत यापुढे सदर मार्गदर्शक नियमावलीचा अवलंब करणेत यावा.

**-Sd-**

अध्यक्ष
(मा. प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे)
भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,
सांगलीवाडी, सांगली